# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-९/ब वर्ग/निनिअ नियुक्ती आदेश/१८७२/२०२१ दिनांक २५/०६/२०२१

**वाचावे**:- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ CB (१) व (१४)

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४

३.प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा / कक्ष अभिलेख धारिका क्र. ४९/ नैमित्तिक रिक्त जागा /७७५०/सन १८, दिनांक २६.१०.२०१८.

४. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा / कक्ष अभिलेख धारिका क्र. ४९/ नै. संचालक रिक्त पद /परिपत्रक/३४२८/सन १९, दिनांक २८.०३.२०१९.

५. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग **आठ** महाराष्ट्र कायदा क्र. २३/२००९ दिनांक २३.०७.२०१९ रोजी प्रसिध्द झालेले महाराष्ट्र सहकारी संस्था ( सुधारणा) अधिनियम २०१९

---

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ CB मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली असुन उक्त कलमाच्या उपकलम (१) नुसार सहकारी संस्थांच्या समितीच्या सार्वत्रिक निवडणुका, नैमित्तिक रिक्त पदे व समिती सदस्यांच्या पदाधिकारी यांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने घ्यावयाच्या आहेत आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ CB (१४) (B) मधी ल तरतूदीनुसार प्रत्येक सहकारी संस्थेच्या समितीमध्ये किंवा तिच्या पदाधिका-यांमध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही नैमित्तिक रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून १५ दिवसाच्या आत प्राधिकरणास कळविणे बंधनकारक आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ७४ मधील तरतूदीनुसार एखादया संस्थेच्या समिती सदस्याचे निधन झाल्यामुळे , त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला अनर्ह ठरविल्यामुळे अथवा त्याला काढून टाकण्यात आल्यामुळे अथवा त्याच्या पदाची मुदत संपण्यापूर्वी अथवा अन्यथा काम करण्यास तो असमर्थ झाल्याने रिक्त झालेल्या जागा हया नैमित्तिक रिक्त जागा सदरात मोडत असल्याने सदरच्या नैमित्तिक रिक्त जागा अधिनियमातील तरतूदीनुसार भरण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने सहकार कायदयामध्ये दुरूस्ती करून त्याबाबतची अधिसुचना राजपत्र असाधारण भाग आठ मध्ये दिनांक २३.०७.२०१९ रोजी प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसुचनेनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ CB उप कलम (11) मध्ये खालील प्रमाणे परंतूक समाविष्ट करणेत आले आहे.

"Provided further that, in case of housing society having less than or up to २५० members, the elections of the Committee shall be conducted by the said housing society in the manner as may be prescribed"

ज्याअर्थी, सहकार कायदयामध्ये समाविष्ट केलेल्या उपरोक्त परंतूकानंतर शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दुरूस्ती करून सहकार कायदयामध्ये नव्याने सहकारी गृहनिर्माण संस्था बाबत प्रकरण XIII- B समाविष्ट केले आहे. सदर समाविष्ट केलेल्या प्रकरणातील कलम 154 B 19(4) मध्ये खालील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

"Any casual vacancy in the commitee may be filled by co-option and term of the co-opted Member shall be co-termiuns with the term of the Committee.

उपरोक्त सुधारणा होणेपूर्वी सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमधील नैमित्तिक रिक्त पदे (Causal Vacancy) कशी भरावीत याबाबत प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ३ व ४ चे आदेश निर्गमित केले होते. सदर आदेश हे सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्थांसह सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना लागू होते. परंतू शासनाने सहकार कायदयामध्ये कलम ७३(CB) (11) मध्ये समाविष्ट केलेल्या परंतूकानुसार २५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका सदर परंतूक समाविष्ट झाल्यापासून प्राधिकरणामार्फत् पार पाडल्या जात नाहीत. त्यामुळे वाचावे क्रमांक ३ व ४ मधील नैमित्तिक रिक्त पदे

Scanned with CamScanner

भरणेबाबतचे आदेश २५० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना लागू होणार नाहीत हे या ठिकाणी स्पष्ट करण्यात येत आहे. तसेच कायदयातील उपरोक्त सुधारित दुरूस्तीनंतरही २५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका प्राधिकरणामार्फतच पार पाडल्या जाणार आहेत. त्यामुळे वाचावे क्रमांक ३ व ४ मधील प्राधिकरणाचे आदेश २५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना लागू राहणार आहेत. तथापि, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम 154 B 19(4) मधील सुधारीत तरतूद विचारात घेतल्यास सहकारी गृहनिर्माण संस्थांना समितीच्या कालावधीमध्ये नैमित्तिकरित्या रिक्त् झालेले कोणतेही पद (Any) स्विकृतीने / नामनिर्देशनाने (Co-Option) भरता येणार आहे. त्यामुळे प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या वाचावे क्रमांक ३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नैमित्तिक कारणामुळे रिक्त झालेली प्रथम दोन पदे संचालक मंडळाचा अडीच वर्षाचा कालावधी उलटल्यानंतर स्वीकृतीने भरता येऊ शकतील ही बाब लागू होणार नाही म्हणून प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या वाचावे क्र. ३ व ४ च्या आदेशामध्ये २५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी कलम 154 B 19(4) मधील तरतूदीशी अनुरूप / सुसंगत बदल करण्याची बाब प्राधिकरणाच्या विचारधीन होती.

त्याअर्थी, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण २५० पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या समिती सदस्यांमधील रिक्त झालेल्या नैमित्तिक जागा भरणेबाबत प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम चे नियम ३(v) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करून खालील आदेश पारीत करीत आहे.

-: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ **CB** आणि महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (v) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून प्राधिकरण ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची सभासद संख्या २५० पेक्षा जास्त आहे अशा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या निवडणूकीच्या निकालाच्या दिनांकापासून संस्थेच्या समितीच्या कालावधीमध्ये अशा समितीत निर्माण झालेल्या नैमित्तिक रिक्त जागा, ज्या प्रवर्गातील आहेत त्याच प्रवर्गातील पात्र सदस्यांमधून कलम 154 B 19(4) मध्ये नमूद केल्यानुसार संचालक मंडळातील कोणतेही नैमित्तिक रिक्त पद स्विकृतीद्वारे भरण्यास आदेश देत आहे. असे कोणतेही संचालकाचे पद स्वीकृती करण्याकरीता वाचावे क्र. ३ व ४ मधील इतर सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या आदेशानुसार.**

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व) .

Scanned with CamScanner